| MHKO110003272014 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १०३/२०१४ मधील निशाणी क्र. १०२ वरील आदेश**<br>**( श्रीमती लक्ष्मीबाई बाबुराव खोंद्रे वगैरे विरुध्द श्री.बाजीराव बाबुराव खोंद्रे वगैरे )** |
|---|---|

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १० –ब विनोद शामराव खोंद्रे यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की , प्रतिवादी १०–ब विनोद शामराव खोंद्रे हे दिनांक २६.०६.२०२१ रोजी सनराईज हॉस्पीटल,कोल्हापूर येथे मयत झाले आहेत. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्रमांक १०–ब यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वादी यांना प्रतिवादी क्रमांक १०–ब हे मयत झाल्याबाबत माहीती नव्हते. तसेच त्यांचा मृत्यू नोंद दाखलासुध्दा वेळेत न मिळालेने त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे शक्य झाले नाही . प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही . याउलट नामंजूर झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे . तसेच दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून वादी यांना विनाकारण न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदरहू अर्जाचे पाठीमागील बाजूस सादर केले असून प्रस्तुत प्रतिवादी यांचे म्हणणे असे की , सदर कामातील वादी व प्रतिवादी हे मयत झाल्याचे माहीती असतानाही जाणूनबुजून विलंब केला असलेने . अबेटमेंटचा हुकूम झाला

आहे. तरी सदरचा अर्ज फेटाळणेत यावा व अर्ज मंजूर करणेचा झालेस जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे.

**४.** वादी यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा सरसनिरस मानाने वाटप होऊन , तुटक कब्जा मिळणेकरीता व कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक १०–ब यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे . त्याकरीता प्रतिवादी क्रमांक १० –ब यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणे आवश्यक आहे . प्रतिवादी क्रमांक १० –ब चे कायेदशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे वादींनी कथन केलेले कारण हे सकृतदर्शनी संयुक्तीक वाटते . त्यामुळे वादीवर अर्जाचा खर्च बसविणे उचित व योग्य राहणार नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

वादी यांचा निशाणी क्र. १०२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.28 11:37:44 +0530

ठिकाण – पेठवडगांव                    ( एस.डी.शिरसाट )

दिनांक – २३/११/२०२२                    दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. पेठवडगांव